आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१९ एप्रिल २०२६ - रविवार

**ठळक बातम्या**

- विदर्भात उन्हाचा कहर, अकोल्यात पारा ४५ अंशावर /राज्यात हा संपूर्ण आठवडा पावसाचा

- यंदाच्या खरीप हंगामात जास्तीत जास्त पेरणीच्या नियोजनाच्या दृष्टीनं कृषी विभागाकडून पूर्वतयारी सुरू

- तामिळनाडूमध्ये फटाक्यांच्या कारखान्यात झालेल्या स्फोटात २१ कामगारांचा मृत्यू

**आणि**

- भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या वरिष्ठ निवड समितीचे अध्यक्ष म्हणून अजित आगरकर यांना मुदतवाढ

**<><><><><><>**

विदर्भात उन्हाचा पारा मोठ्या प्रमाणात वाढला असून आज अकोल्याचं तापमान आज ४५ डिग्री सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं. प्रचंड उष्णता असल्यामुळे नागरिकांना आवश्यक ती खबरदारी घेण्याचं आवाहन जिल्हा प्रशासनाने केलं आहे. दुपारी बारा ते चार या वेळेत बाहेर जाणं टाळावं, वारंवार पाणी प्यावं अशा सूचना प्रशासनाने दिल्या आहेत. चंद्रपूरचं तापमान ४४ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचलं आहे. त्यामुळे जिल्ह्यातल्या शाळा सकाळी अकरा वाजेपर्यंतच सुरू ठेवण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. गोंदियातही उन्हाचा कडाका वाढला असून तापमान ४३ अंश सेल्सिअसच्या पुढे गेल आहे. उन्हात उभं राहून काम करणाऱ्या वाहतूक पोलिसांसाठी पाणी आणि ओआरएस उपलब्ध करून देणार असल्याचं वाहतूक पोलीस निरीक्षकांनी सांगितलं. पुढचे दोन दिवस उन्हाचा पारा वाढणार असल्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

**<><><><><><>**

गेल्या २४ तासात मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडला.

कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात येत्या २५ तारखेपर्यंत, तर विदर्भात २२ तारखेपर्यंत तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**<><><><><><>**

राज्यात यंदाच्या खरीप हंगामात जास्तीत जास्त पेरणीचं नियोजन केलं असून त्यादृष्टीने कृषी विभागाने पूर्वतयारी सुरू केल्याची माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली आहे. ‘एल निनोचा’ शेतीवर होणारा संभाव्य परिणाम, पर्जन्यमानाची स्थिती आणि त्यानुसार पीक पद्धती यावर चर्चा करण्यासाठी पुण्यात राज्यस्तरीय कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं असून, शिवाजीनगर इथं ‘सारथी’च्या नव्या सभागृहात उद्या सकाळी साडे दहा वाजता ही कार्यशाळा आयोजित केल्याची माहितीही भरणे यांनी दिली.

<><><><><>

ग्रामीण भागातल्या विद्यार्थ्यांना काळाशी सुसंगत कौशल्य शिक्षण आणि प्रशिक्षण मिळावं यासाठी येत्या जूनपासून शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि शासकीय तांत्रिक विद्यालयांमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करू अशी घोषणा कौशल्य रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी केली. नागपुरात कामठी इथल्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि शासकीय तांत्रिक विद्यालयाच्या नवीन इमारतीचं लोकार्पण आज राज्याचे महसूल मंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आलं. त्यावेळी ते बोलत होते. या संस्थेचं नामकरण आता शहीद हेमंत करकरे असं करण्याचा निर्णय घेतल्याचंही लोढा यावेळी म्हणाले. तर सौर ऊर्जा तंत्रज्ञान, डिजिटल इंडियाला साकारणारं तंत्रज्ञान आणि सेवाक्षेत्रात ग्रामीण भागातील युवकांना रोजगाराच्या संधी मिळण्याच्या दृष्टीने या संस्थेत विविध अभ्यासक्रम सुरू व्हावेत, अशी मागणीही चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी केली.

<><><><><>

राज्यासह देशभरात आज अक्षय्य तृतीयेचा सण उत्साहात साजरा होत आहे. साडेतीन मुहुर्तांपैकी एक समजला जाणारा हा सण, कधीही नाश न पावणारं सुख आणि समृद्धीचं प्रतीक समजला जातो. अक्षय्य तृतीयेच्या निमित्तानं महाराष्ट्रात मुंबईसह राज्यभरात सणाचा उत्साह आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासह, मराठवाड्यातल्या सर्व प्रमुख शहरांच्या बाजारपेठांमध्ये आज नागरिकांचा खरेदीचा उत्साह दिसून येत आहे. बाजारपेठ आंबे, डांगर आणि मातीच्या घागरींनी सजली आहे. आजच्या मुहूर्तावर राज्यात मोठ्या प्रमाणात विवाह सोहळे देखील होतात. हे लक्षात घेऊन, राज्य शासनानं बाल विवाह रोखण्यासाठी कडक

उपाययोजना केल्या आहेत. यंदा, सोन्याचे दर विक्रमी पातळीवर असले, तरी सोनं खरेदीचा उत्साह मात्र कायम आहे.

आज परशुराम जयंती आणि महात्मा बसवेश्वर यांची जयंती देखील साजरी होत आहे. त्या निमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, राज्यपाल जिष्णु देव वर्मा आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

तामिळनाडूमध्ये मुथुलिंगापुरम इथल्या एका फटाक्यांच्या कारखान्यात आज दुपारी झालेल्या स्फोटात २१ कामगारांचा मृत्यू झाल्याचं वृत्त आहे. स्फोटात ६ जण गंभीर जखमी झाले असून, त्यांना जवळच्या रुग्णालयात दाखल केलं आहे. कारखान्यातला ज्वलनशील रासायनिक पदार्थ हलवला जाताना हा स्फोट झाला. दुर्घटनेतल्या मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता  आहे.

तामिळनाडूमधल्या दुर्घटनेत झालेल्या जीवित हानीबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दुःख व्यक्त केलं आहे. दुर्घटनेतल्या मृतांच्या कुटुंबीयांप्रति त्यांनी सह-वेदना व्यक्त केली असून,  जखमींच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी अशी प्रार्थना केली आहे.

**<><><><><>**

बुलडाणा जिल्ह्यात समृद्धी महामार्गावर आज पहाटे एक खासगी बस उलटून झालेल्या अपघातात एका बालकाचा मृत्यू झाला, तर २५ प्रवासी जखमी झाले. बस उलटल्यावर मागून येणारी गाडी त्यावर आपटून त्या गाडीचंही नुकसान झालं. जखमी प्रवासी जवळच्या खासगी रुग्णालयात उपचार घेत आहेत. बसचा चालक आणि क्लिनर रील बनवण्यात व्यग्र असल्यामुळे हा अपघात झाल्याची माहिती प्रवाशांनी दिली.

**<><><><><>**

हिंगोली जिल्ह्यात नांदेड-हिंगोली राष्ट्रीय महामार्गावर कळमनुरी तालुक्यातल्या कामठा फाटा इथं आज दोन ट्रकची टक्कर होऊन झालेल्या अपघातात एकाचा जागीच मृत्यू झाला, तर तीनजण गंभीर जखमी झाले.  जखमींना उपचारासाठी नांदेडला पाठवलं असल्याचं पोलिसांनी सांगितलं.

**<><><><><>**

बीसीसीआय अर्थात भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं वरिष्ठ निवड समितीचे अध्यक्ष म्हणून अजित आगरकर यांचा कार्यकाळ एका वर्षानं वाढवला आहे. २०२७ च्या एकदिवसीय क्रिकेट विश्वचषकाच्या तयारीच्या दृष्टीनं हा निर्णय घेतला असल्याचं नियामक मंडळानं म्हटलं आहे. जुलै २०२३ मध्ये आगरकर यांची वरिष्ठ निवड समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली होती. त्यानंतर त्यांच्या आत्तापर्यंतच्या कार्यकाळात निवडलेल्या भारतीय संघांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या वतीनं आयोजित चार स्पर्धांच्या अंतिम फेरीत धडक मारली, आणि त्यापैकी दोन टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक तसंच, एका आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेचं विजेतेपदही पटकावलं आहे.

<><><><><>

पालघर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाशिवाय विकसित भारताचा संकल्प पूर्ण होऊ शकत नाही, असं राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी म्हटलं आहे. ते आज आज पालघर जिल्ह्यातल्या डहाणू तालुक्यात ओसरविरा इथं, अक्षय्य तृतीये निमित्त आयोजित फिरते दवाखाने आणि रुग्णवाहिका सेवांच्या लोकार्पण सोहळ्यात बोलत होते. आरोग्य सुविधा, या केवळ शहरांपुरत्याच मर्यादित न राहता, दुर्गम भागातल्या प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवणं, हा सरकारचा संकल्प असल्याचं ते यावेळी म्हणाले. पालघर जिल्ह्यासारख्या आदिवासीबहुल क्षेत्रात रोजगार, आरोग्य आणि पिण्याच्या पाण्याची उपलब्धता वाढवण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याचं त्यांनी यावेळी आश्वासन दिलं.

<><><><><>

बारामती विधानसभा मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीत सुनेत्रा पवार यांच्या प्रचारासाठी आपण मैदानात उतरल्याचं राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार रोहित पवार स्पष्ट केलं आहे. ते आज लातूरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे दिवंगत नेते जनार्दन वाघमारे यांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुबीयांची सांत्वनपर भेट घेण्यासाठी आले होते, त्यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. नारीशक्ती विधेयक हे केवळ नावापुरतं आहे. २०११च्या जनगणनेच्या आधारावर खासदारांची संख्या वाढवून काही विशिष्ट भागांना राजकीय फायदा करून देण्याचा भाजपाचा प्रयत्न असल्याची टीकाही त्यांनी केली.

<><><><><>

सांगली जिल्ह्यात मिरज, तासगाव आणि कवठेमहांकाळ तालुक्यात आज मेघगर्जनेसह जोरदार पाऊस झाला. गेल्या काही दिवसापासून तापमानवाढीमुळे उकाडा जाणवत होता. मात्र, आज संध्याकाळी अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांची तारांबळ उडाली. काही ठिकाणी विद्युत पुरवठा खंडित झाला होता. अनेक ठिकाणी पाणी साचलं होतं. कालही मिरज आणि कवठेमहांकाळ तालुक्यात जोरदार पाऊस झाला होता.

//<><><><><><>//